CMYK

तोफा थंडावल्या : छुप्या प्रचारावर उमेदवाराची दारोमदार ! >> पान 2

पैशावाल्यांना त्यांची जागा दाखवून द्या >> पान 3

मतदारसंघात सुनामी आली आहे. या सुनामीत हा निष्क्रिय आमदार वाहून जाणार : सिद्धार्थ खरात >> पान 4

**सुविचार**

आपल्या विचारांप्रमाणेच आपले जीवन बनते.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




नयनतारा स्टारर 'रक्काई'च्या पोस्टरसह टीझर आणि शीर्षक झालं प्रदर्शित आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 100 ■ मंगळवार, दि. 19 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## निवडणूक अधिकाऱ्यांकडून एक कोटी ९८ लाख रुपयांची रक्कम हस्तगत



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक मध्ये आज सकाळी एका नामांकित हॉटेलमध्ये मोठी रक्कम आढळून आली होती या संदर्भात निवडणूक आयोगाच्या पथकाने छापा टाकून तपास केला असता एकूण रक्कम ही १ कोटी ९८ लाख इतकी असल्याची माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली तर ही रक्कम जयंत साठे यांच्याकडून हस्तगत केली असून या संदर्भात पुढील कारवाई केली जाईल अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुनीता कुमावत यांनी दिली.

## माझा प्रचार माझे कार्यकर्ते करत आहेत त्यामुळे ही जागा बहुमतांनी निवडून येईल- नाना पटोले



दैनिक आपला विदर्भ

**भंडारा /प्रतिनिधी :** भंडारा जिल्ह्यातील साकोली विधानसभा मतदार संघातील कॉंग्रेस उमेदवार नाना पटोले यांच्या भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत शेकडो बाईक स्वार सहभागी झाले होते. साकोली विधानसभा क्षेत्रातील माझा निवडणूकीचा प्रचार माझे कार्यकर्ते करत असून ही सीट बहुमताने निवडून येईल यात काही शंका नाही. महाराष्ट्र मधील चित्र महाविकास आघाडीच्या बाजूनं आहे. महाराष्ट्र द्रोही व भ्रष्टाचारी सरकार शेतकरी विरोधी आहे. तरुण, महिला, गरीब लोकं या सरकारच्या विरोधात आहे. या सरकारला सत्तेच्या बाहेर बसविण्याची आता लोकांनी मानसिकता तयार केली आहे अशी प्रतिक्रिया कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

## दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

**बुलढाणा /प्रतिनिधी :** जिल्हा रूग्णालयात नियमितपणे बुधवारी दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र बुधवार, दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी सार्वजनिक मतदान निमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.






# शांतता कालावधीत मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या राजकीय प्रचार, प्रसारावर बंदी

## नियमांचे उल्लंघन झाल्यास निवडणूक आयोग करणार कडक कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी सोमवार, दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ६ वाजल्यापासून शांतता कालावधी सुरू झाला आहे. मतदान संपेपर्यंतच्या ४८ तासांमध्ये, लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या कलम १२६ अंतर्गत मतदारांवर प्रभाव टाकणारा प्रचार आणि सार्वजनिक सभा, मिरवणुका आयोजित करण्यास, उपस्थित राहण्यास अथवा सहभागी होण्यास मनाई आहे. या अटींचे उल्लंघन झाल्यास दोन वर्षापर्यंत तुरुंगवास अथवा दंड अथवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने देण्यात आली.

लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने निर्देश जारी केले आहेत. निवडणूक कालावधीत मुद्रित माध्यमांमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या बाजूने किंवा विरोधात कोणतीही जाहिरात/ निवडणूकविषयक आशय– मजकूर दिला गेला असल्यास त्याबाबत संबंधित प्रकाशकाचे नाव आणि पत्ता, तसेच संबंधित आशय – मजकूर / जाहिरातीवर नमूद करावा. या निर्देशांसोबतच आयोगाने भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ एच विचारात घेण्याबाबतही निर्देशित केले आहे. या कलमाअंतर्गत उमेदवाराच्या अधिकृत परवानगीशिवाय संबंधित उमेदवाराच्या निवडणुकीचा प्रचार किंवा निवडणुकीसाठी खर्च करण्याच्या हेतूने इतर सर्व गोष्टींसह जाहिराती, प्रचार किंवा प्रकाशनासाठी खर्च करण्यास मनाई केली गेली आहे.

निवडणूक प्रचाराच्या शांतता काळामध्ये मुद्रीत माध्यमांमध्ये छापण्यात येणाऱ्या राजकीय जाहिरातीस जाहिरात पूर्व प्रमाणिकरण समितीची मान्यता असल्याशिवाय या जाहिराती वृत्तपत्रामध्ये छापू नये, अशा आयोगाच्या सूचना आहेत. दृकश्राव्ये माध्यमे (टेलिव्हिजन, केबल नेटवर्क, रेडिओ आणि सोशल मीडिया) यावर प्रचाराच्या शांतता कालावधीत राजकीय जाहीरातींना मनाई आहे.

राजकीय जाहिरातीसाठी पूर्व–प्रमाणीकरणाबाबतचे निर्देश भारत निवडणूक आयोगाच्या दि.२४ ऑगस्ट, २०२३ च्या आदेशान्वये देण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रचाराच्या शांतता कालावधीतील मुद्रित माध्यमे आणि त्यापूर्वीच्या कालावधीसाठी दृकश्राव्य माध्यमे (टेलिव्हिजन, केबल नेटवर्क, रेडिओ आणि सोशल मिडिया) ह्यावरील राजकीय जाहिरातींचा समावेश आहे.



पूर्व प्रमाणीकरणासाठीच्या निर्देशांचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या कायदेशीर कारवाईबाबत स्पष्ट तरतूद आहे. सर्वोच्च न्यायालयाने किंवा केबल टेलिव्हिजन नेटवर्क (नियमन) कायदा, १९९५ मधील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन झाल्यास, असे उल्लंघन करणाऱ्याने आपली उल्लंघन करणारी कृती तात्काळ थांबवावी. निवडणूक आयोगामार्फत असे उल्लंघन करणाऱ्याच्या उपकरणांची थेट जप्तीही केली जाऊ शकते. यासंदर्भात दिल्या गेलेल्या कोणत्याही सूचनांचे पालन न केल्यास तो सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरतो व तसे न्यायालयीन प्रकरण दाखल होऊ शकते.

सर्व केबल नेटवर्क, टी.व्ही. चॅनल, रेडिओ, सोशल मीडिया याद्वारे राजकीय जाहिरातीचे प्रसारण करण्यापूर्वी या जाहिरातीचे प्रमाणीकरण असल्याचे खातरजमा करणे आवश्यक आहे. जाहिरातीचे प्रमाणकिरण असल्याशिवाय राजकीय जाहिराती प्रसारीत करण्यात येवू नये. तसेच कोणत्याही केबल नेटवर्क, टी.व्ही. चॅनल यांनी प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष किंवा छुप्या पध्दतीने राजकीय पक्षांच्या जाहिरातीचे प्रमाणिकरण नसल्यास या जाहिराती प्रसारित न करण्याची दक्षता घेण्यात यावी या निर्देशांचे उल्लंघन केल्यास न्यायालयाच्या आदेशाचा अवमान ग्राह्य धरून कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्य निवडणूक अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

## २० नोव्हेंबरला होणाऱ्या मतदानासाठी यंत्रणा सज्ज; - मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. एकूण २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. राज्यातील ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांसाठी १,००,४२७ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदानाची वेळ ही सकाळी ७:०० ते संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत राहील. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून निवडणुकीची संपूर्ण तयारी झालेली असून राज्यातील मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री कधीच नाही पण ५ मिनिटं तरी पंतप्रधान होईन, जानकरांचं विधान

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. प्रचार शिगेला पोहोचला असून प्रचाराच्या तोफा काही तासात थंडावतील. दरम्यान, प्रचारसभेत रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी मोठं विधान केलंय. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कधीच होणार नाही पण पाच मिनिटांसाठी तरी देशाचा पंतप्रधान होईन असं विधान राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी केलं. रासपच्या उमेदवाराच्या प्रचार सभेत बोलताना जानकर यांनी हे वक्तव्य केलंय. यावेळी त्यांनी भाजपवरही जोरदार टीका केली. महादेव जानकर यांनी म्हटलं की, आईची शप्पथ घेऊन सांगतो, मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कधीच होणार नाही. पण पाच मिनिटांसाठी का होईना पण देशाचा पंतप्रधान झाल्याशिवाय राहणार नाही.

भूम शहरात रासपचे उमेदवार डॉक्टर राहुल घुले यांच्या प्रचारासठी महादेव जानकर यांनी सभा घेतली. या सभेत बोलताना महादेव जानकर यांनी पंतप्रधान पदाबाबद विधान केलं. तसंच भाजपवरही फोडाफोडीच्या राजकारणावरून टीका केली.

महादेव जानकर म्हणाले की, भाजपने पवारांचं घर फोडलं. बाळासाहेब ठाकरे यांचं चिन्ह चोरलं. भाजप ही चालू पार्टी आहे. ते माणसात माणूस आणि पक्षात पक्ष ठेवत नाहीत अशा शब्दात जानकर यांनी भाजपवर हल्लाबोल केला.



जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात मतदार माहिती चिठ्ठी वाटप सुरू आहे. यासाठी मतदारांच्या घरोघरी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओ पोहोचत आहे. ज्यांना ऑनलाइन मतदान माहिती चिठ्ठी काढायची आहे. त्यांनी वोटर हेल्पलाइन हा प डाऊनलोड करावा. या पवर वोटर सर्विस या विभागात गेल्यावर आपल्या बीएलओचा नंबर सुद्धा मिळतो. नागरिकांनी आपली मतदान माहिती चिठ्ठी हस्तगत करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केली आहे.

## संजय राऊत गटारातला बेडूक, मोदी–शाहांना गाडण्याची भाषा करणाऱ्या राऊतांवर भाजपचा हल्लाबोल

**नाशिक/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ च्या प्रचाराच्या तोफा आज थंडावणार आहेत. विधानसभेची रणधुमाळी सुरु झाल्यानंतर महायुती आणि महाविकास आघाडीकडून एकमेकांवर जोरदार हल्लाबोल केला जात आहे. त्यातच शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोदी आणि शाह महाराष्ट्राचे दुश्मन आहेत. त्यांना गाडल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका केली होती. यावरून मंत्री गिरीश महाजन यांनी संजय राऊत यांच्यावर जोरदार पलटवार केलाय.

गिरीश महाजन म्हणाले की, ते आमच्या सोबत इतके वर्ष होते, त्यावेळेस त्यांना कळालं नाही कोण शत्रू आहे कोण दुश्मन आहे. संजय राऊत यांना कोणी गांभीर्याने घेत नाही, वाटेल ती बडबड ते करत असतात. त्यांनी काहीही म्हटलं तरी त्याचा मतदानावर परिणाम होणार नाही. पण त्यांनी आपली पात्रता पाहूनच बोललं पाहिजे, असं मला वाटतं. आमचा पक्ष देशभर आहे ते आपले गटारातले बेडूक आहेत. डबक्यातले बेडूक आहेत, असा हल्लाबोल त्यांनी संजय राऊत यांच्यावर केला. ते पुढे म्हणाले की, ८७ टक्के राज्यात आमची सत्ता आहे. आम्ही जिंकलो तर तिकडे आनंद होतो. मध्य प्रदेश जिंकला तर आम्ही फटाके फोडतो, झारखंडमध्ये उद्या जिंकलो तर आम्ही इथे फटाके फोडू, त्यात त्यांना वाईट का वाटतंय? तुम्हाला कोण आहे? तुम्हाला कोणीच नाही. त्यांनी आपली पात्रता पाहूनच बोललं पाहिजे, असा टोला देखील गिरीश महाजन यांनी संजय राऊत यांना लगावला.

## बाळासाहेब ठाकरेंचं स्मरण, पंढरीची वारी अन् महायुतीचा प्रचार...

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** तेलुगु सुपरस्टार तथा आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण हे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ रविवारी (१७ नोव्हेंबर) चंद्रपूरमध्ये आले होते. यावेळी पवन कल्याण यांना पाहण्यासाठी तुफान गर्दी झाली होती. चंद्रपुरात रोड शो झाल्यानंतर ते सभास्थळी पोहोचताच नागरिकांनी एकच जल्लोष केला. त्यानंतर पवन कल्याण यांनी मराठी, हिंदी आणि तेलुगु भाषेत भाषण केलं.

चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या संख्येनं तेलुगु भाषिक मतदार आहेत. यापूर्वी तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी घुग्गुस येथे कॉंग्रेसच्या प्रचारासाठी सभा घेतली होती. त्यानंतर रविवारी महायुतीच्या प्रचारासाठी पवन कल्याण चंद्रपुरात आले. बल्लारपूर येथे भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ 'जनसभा', तर चंद्रपूर येथे किशोर जोरगेवार यांच्या प्रचारार्थ रोड शोचं आयोजन करण्यात आलं होतं.

मराठी, हिंदी आणि तेलुगु भाषेत भाषण : यावेळी पवन कल्याण यांनी तेलुगु, मराठी आणि हिंदी भाषेमध्ये संवाद साधला. सुरुवातीला त्यांनी 'जय भवानी जय शिवाजी जय महाराष्ट्र' असा जयघोष केला. तसंच शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींनाही अभिवादन केलं. ''माझे मराठी शिकण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मी मराठी बोलताना चुकलो तर मला क्षमा करा. पांडुरंगाच्या वारीची परंपरा असणाऱ्या या महाराष्ट्रात मला प्रचारवारीसाठी येता आलं, याचा आनंद आहे'', अशा भावनाही त्यांनी व्यक्त केल्या.

सुधीर मुनगंटीवार यांच्याविषयी काय म्हणाले? : पवन कल्याण म्हणाले, ''ज्या बल्लारपूरच्या सागवाननं अयोध्येतील राम मंदिराचा कोपरा न् कोपरा सुगंधीत झाला. त्या बल्लारपूरचा विकास बघून मी थक्क झालोय. त्यामुळं 'बाहुबली' चित्रपटात ज्याप्रमाणे बाहुबलीनं राजमाता शिवगामीची पावलं थांबू दिली नाहीत. त्याचप्रमाणे तुम्ही देखील सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात विकासाची पावलं थांबू देऊ नका. बल्लारपूरच्या 'पॉवरफुल्ल' विकासासाठी मुनगंटीवार यांना अभूतपूर्व मताधिक्यानं विजयी करा'', असं आवाहन यावेळी पवन कल्याण यांनी केलं.




विकासाच्या दिशेनं सुरू– पुढं ते म्हणाले, ''सुधीर मुनगंटीवार यांच्या विकासाच्या दृष्टीनं बल्लारपूरचा प्रवास सर्वांगीण विकासाच्या दिशेनं सुरू आहे.

मुनगंटीवार यांनी एसएनडीटी, स्व. सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्र मतदारसंघात आणून मोठं काम केलंय. भारताला आर्थिक महासत्ता होण्यासाठी आणि महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करण्यासाठी अशाप्रकारच्या केंद्रांचं मोठं योगदान राहणार आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी सुधीर मुनगंटीवार यांनी अत्यंत महत्त्वाचं पाऊल टाकलं'', असंही पवन कल्याण म्हणाले.

नागरिकांची गर्दी : ११ वाजता आयोजित करण्यात आलेल्या सभेला पवन कल्याण हे ३.३० वाजता पोहोचले होते. मात्र, ते येताच नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह संचारला. कल्याण यांना बघण्यासाठी व्यासपीठासमोर असलेल्या मंचावरदेखील लोक चढले होते. अखेर पोलिसांनी त्यांना खाली उतरवलं. यानंतर चंद्रपूर येथे रोड शो आणि बाईक रॅली दरम्यान देखील अशीच गर्दी झाली. मात्र, कल्याण यांना आधीच उशीर झाल्यानं त्यांना हा कार्यक्रम आटोपता घ्यावा लागला.

CMYK

## २०४० मध्ये भारतीय जाणार चंद्रावर...

इस्रोचे प्रमुख डॉ. एस. सोमनाथ यांनी 'भारतीयांना २०४० पर्यंत चंद्रावर उतरवण्याचे' ध्येय असल्याचे नुकतेच सांगितले आहे. त्यासाठी अवकाश स्थानक उभारणेही गरजेचे आहे. भारतीय अवकाश संशोधन केंद्र म्हणजेच इस्रो हा भारताचा मानबिंदू असून भारतीयांसाठी अभिमान वाटणारी संस्था आहे. 'इस्रो'ची स्थापना १९६२ मध्ये झाली. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी उद्याच्या भविष्यात अवकाश मोहिमांत भारताचा सहभाग उत्तरोत्तर वाढत जाईल, असे स्वप्न पाहिले होते. महान शास्त्रज्ञ डॉ. विक्रम साराभाई यांच्यावर अंतराळ संशोधन कार्यक्रमाची धुरा सोपविण्यात आली. यानुसार भारतीय राष्ट्रीय अवकाश संशोधन समितीची स्थापना झाली. कालोघात तिचे कार्यक्षेत्र वाढत गेले आणि तिची जागा 'इस्रो' संस्थेने घेतली. अवकाश क्षेत्रात संशोधनात आघाडी घेणाऱ्या या संस्थेने गेल्या तीन-चार दशकांत एकाहून एक सरस कामगिरी केली आहे. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अपुरी साधने असूनही अत्यंत कमी खर्चात स्वदेशी तंत्रज्ञानाच्या बळावर या संस्थेने जगातील नामांकित अवकाश संस्थेशी स्पर्धा केली आहे. एकवेळ जेव्हा साधनांची कमतरता होती तेव्हा रॉकेटला बैलगाडीने नेले जात होते. भारतीय शास्त्रज्ञ दररोज दुपारचे जेवण रेल्वे स्थानकानावर घेत असत. पण आता 'इस्रो'ने देश आणि सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी विकसित केल्या जाणाऱ्या अवकाश विज्ञानाला नवी ओळख दिली आहे. 'इस्रो'कडे दळणवळण उपग्रहांचा संच असून आगामी काळात देशातीलच नाही तर जगभरातील गरजू देशांच्या दळणवळणाची गरज भागविण्याचे काम करत आहे. प्रसारण, दळणवळण, हवामानाचा अंदाज, आपत्ती व्यवस्थापन उपकरण, भौगोलिक माहिती व्यवस्था, जलवाहतूक सेवा आदी गोष्टींसाठी 'इस्रो'चे विशेष उपग्रह प्रदान करताहेत. वास्तविक दिवसेंदिवस उपग्रहांची उपयुक्तता वाढत असल्याने विश्र्वसनीय आणि प्रणाली विकसित करणे भारतासाठी गरजेचे होते. यानुसार भारताने या क्षेत्रात आत्मनिर्भर होत 'पीएसएलव्ही' रॉकेटचा विकास झाला. प्रतिष्ठित 'पीएसएलव्ही' हा विविध देशाच्या उपग्रहांचा सर्वाधिक सुलभ प्रक्षेपक ठरला. विश्र्वसनीयता आणि उपयुक्ततेमुळे 'पीएसएलव्ही' ला आंतरराष्ट्रीय पाठबळही वाढले. 'इस्रो'च्या चांद्रयान - १ आणि चांद्रयान -३ चे यशस्वी उड्डाण हे संपूर्ण जगाला अचंबित करणारे ठरले. इस्रो जागतिक पातळीवरची शक्तिशाली अवकाश संशोधन संस्था होईल, याची कोणी कल्पनाही केली नव्हती. इस्रोला मिळणारे यश हे प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. आता भारताने अवकाश मोहिमांच्या तारखांची घोषणा केली. 'इस्रो'चे प्रमुख एस. सोमनाथ यांनी मानवी अवकाश म हीम गगनयान २०२६ मध्ये सुरू होण्याची शक्यता वर्तविली. त्याचबरोबर चंद्रावरून नमुने आणण्यासाठी २०२८ मध्ये चांद्रयान- ४ अवकाशात झेपावणार आहे. भारत आणि अमेरिकेची ही संयुक्त मोहीम २०२५ मध्ये कार्यान्वित होईल; तर चांद्रयान मोहीम - ५ ही जपानच्या अवकाश संस्थेंसह तडीस नेली जाईल. चांद्रयान- ५ च्या माध्यमातून पाठविण्यात येणारा रोव्हर हा ३५० किलोचा असेल. २०४० पर्यंत चंद्रावर माणूस पाठविण्याची 'इस्रो'ची योजना आहे. वास्तविक, इस्रोच्या प्लॅनिंग कमिटीकडून मानवी अंतरिक्ष मोहिमेला २००४ मध्येच मान्यता देण्यात आली होती आणि तेव्हापासूनच अशा मिशनची तयारी सुरू झाली होती. सप्टेंबर महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने चार महत्त्वाच्या अंतराळ मोहिमांना मंजुरी दिली. यामध्ये चांद्रयान- ४, व्हीनस ऑर्बिटर मिशन, भारतीय अंतरिक्ष स्टेशनची निर्मिती आणि गगनयान यांचा समावेश होता. या मोहिमांचा उद्देश अवकाश संशोधन आणि तंत्रज्ञानामध्ये भारताच्या स्थानाला चालना देणे, आपल्या अंतराळ क्षमता वाढविण्याच्या आणि जागतिक अवकाश संशोधन प्रयत्नांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी देशाचे समर्पण अधोरेखित करणे आहे. गेल्या काही वर्षांत इस्रोने देदीप्यमान यश मिळवले असले, तरी काही आव्हाने देखील आहेत. प्रक्षेपक उच्च तंत्रज्ञानयुक्त करणे, अंतराळवीरांना प्रशिक्षण देण्यासाठी सुसज्ज प्रशिक्षण केंद्रांची उभारणी करणे, जीवरक्षक प्रणाली विकसित करणे आणि उच्च प्रतीच्या स्पेस सूटचा विकास करणे याबाबत आपल्याकडील शास्त्रज्ञ सातत्याने काम करत आहेत. भारताच्या अवकाश क्षेत्राची अजूनही व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. कारण जागतिक पातळीवर अवकाश क्षेत्रात 'इस्रो'चे योगदान केवळ दोनच टक्के आहे. एका दशकात तो वाढवून किमान १० टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे आता खासगी क्षेत्रही अवकाश क्षेत्रात गुंतवणूक करण्यात रुची दाखवत आहेत. अनेक गोष्टी पारंपरिक रूपाने आतापर्यंत केवळ इस्रोकडून केल्या जात होत्या, पण त्या आता खासगी माध्यम तूनही पूर्ण केल्या जात आहेत. त्यामुळे खासगी क्षेत्राचा सहभाग वाढविण्यासाठी नवे धोरण आणण्याची गरज आहे. माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा 'इस्रो'शी निकटचा संबंध राहिला आहे आणि त्यांनी भारताचा अवकाश कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. भारताचा पहिला स्वदेशी प्रक्षेपण यान एलएलव्ही-३, पृथ्वी, अग्नि, त्रिशूळ, नाग आणि आकाश यांसारख्या स्वदेशी बनावटीच्या क्षेपणास्त्रांची त्यांनी निर्मिती केली. तसेच चांद्रयान-१ चे देखील नेतृत्व केले होते. आज 'इस्रो'कडे शास्त्रज्ञांची मोठी टीम आहे आणि अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे नेतृत्व महिला शास्त्रज्ञ करत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक सार्वजनिक उपक्रम अपयशी ठरले गेले, मात्र 'इस्रो'ने अवकाश क्षेत्रात भारताचा दबदबा वाढविला आहे. 'इस्रो'चे महत्त्व अमेरिकी अवकाश संस्था 'नासा' देखील नाकारत नाही. नील आर्मस्ट्राँग हा चंद्रावर उतरलेला पहिला मानव चंद्राच्या पृष्ठभागावर उतरताच तो म्हणाला होता, की हे मानवाचे एक छोटेसे पाऊल आहे; मात्र मानवतेचा खूप मोठा प्रवास आहे. आर्मस्ट्राँग चंद्रावर उतरला त्या अवतरक (लॅन्डर) यानाचं नाव 'इगल' असं होतं आणि माणसाच्या दृष्टीने अंतराळातली ती खरोखरची गरूडझेप होती. त्यानंतर अनेक चांद्रवीर चंद्रावर जाऊन आले. मायकेल कॉलिन्सलाही ती संधी मिळाली. हे पहिले चांद्रवीर मुंबईत आले तेव्हा त्यांना पाहण्याची उत्सुकता अनुभवली होती. पृथ्वी सोडून अंतराळातल्या दुसऱ्या एखाद्या भूभागावर माणसाने जाण्याची ती पहिलीच वेळ होती. आजही चंद्र वगळता अंतराळातल्या अन्य भूप्रदेशात माणूस पोहोचलेला नाही. पण प्रगत अवकाश संशोधनाच्या युगात आणि जगभरात सुरू असलेल्या प्रयत्नांचा वेध घेता येणाऱ्या भविष्यात अनेक अशक्य बाबी शक्यत उतरताना दिसतील. यामध्ये इस्रोचे योगदान मोलाचे राहील यात शंका नाही.

# तोफा थंडावल्या : छुप्या प्रचारावर उमेदवाराची दारोमदार !

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/ प्रतिनिधी : गत सहा महिन्यापासून सुरू असलेली विधानसभेची रणधुमाळी अवघ्या एका दिवसावर आली आहे. सहा महिन्यापासून अनेक मार्गाने तर ५ नोव्हेंबरपासून जाहीररीत्या आमदार करण्यासाठी सुरू असलेला प्रचार दि.१८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता बंद झाला आहे.जाहीर प्रचाराच्या तोफा थंडावल्या असल्या तरी छुप्या प्रचारावर उमेदवारांनी जोर देत भेटीगाठी घेत इतर समाधानही करण्यावर भर दिला असून १९ नोव्हेंबर रोजीची रात ही उमेदवारासाठी कत्तल की रात राहणार आहे. त्यामुळे उमेदवार हे दोन दिवस रात्रीचा दिवस करून छुप्या प्रचारात आघाडी घेण्यासाठी धडपड करीत असल्याचे चित्र संपूर्ण मतदारसंघात दिसून येत आहे.**




मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघांमध्ये गत महिन्यापासून सुरू असलेली राजकीय धुमाळी रणधुमाळी ही अवघ्या काही तासावर आली आहे. मेहकर लोणार मतदारसंघात तब्बल दि.१९ उमेदवार आपले नशीब आजमावत असून यामध्ये भाजप शिवसेना शिंदे गट राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यासह इतर घटक पक्षाच्या मिळून माहिती कडून विद्यमान आ.संजय रायमुलकर हे आपले नशीब आजमावत आहेत. तर त्यांना प्रतिस्पर्धी म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गट राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व काँग्रेस यासह इतर घटक पक्षाच्या मिळून महाविकास आघाडीकडून मंत्रालय सहसचिव पदावरून स्वेच्छा निवृत्ती घेतलेले सिद्धार्थ खरात हे नशिबात आहेत. यासह वंचित बहुजन आघाडी कडून उच्च विद्याविभूषित डॉ.सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण ह्या आपले नशिबात आहेत. मेहकर लोणार मतदार संघात तिरंगी लढत होत असली तरी या मतदारसंघात पक्षाचे व अपक्ष असे तब्बल १९ उमेदवार विधानसभा निवडणुकीत आमदार होण्यासाठी आपले नशीब आजमावत आहेत.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

यासाठी अनेक महिन्यापासून आपले रणनीती आखत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मतदारांच्या भेटी घेत त्याचबरोबर मतदार संघाचा विकासाचा अजेंडा समोर मांडून प्रचार केला आहे. गत १५ ऑक्टोबर पासून विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर व ५ नोव्हेंबरपासून जाहीर प्रचाराला प्रारंभ करत मतदारांनी उमेदवारांनी मतदारांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला. त्यांना विकासाची आश्र्वासन दिले, त्याचबरोबर आपण मतदार संघात सर्वसामान्यांच्या सोयीसाठी प्राथमिक सुविधा उपलब्ध करण्याबरोबरच इतर सर्व घटकांचा विकास करण्याला प्राधान्य देणार असल्याचे सांगून मतदारांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न केला.५ नोव्हेंबरपासून आपल्या पक्षाच्या नेत्याच्या जाहीर सभा घेत विरोधकांवर टीका करत आपल्या पक्षाचे उमेदवार विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसह पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी जीवाचे रान करून रात्रीचा दिवस करून आपला उमेदवार विजयी करण्यासाठी ऑटोकाट प्रयत्न सुरू केले आहेत. मतदारांना विविध प्रकारचे विकास कामाचे आश्र्वासन देत आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न केला. आता प्रत्यक्ष मतदानाला अवघ्या काही तासाचा कालावधी शिल्लक राहिला असून विधानसभा निवडणुकीतील प्रचार तोफा दि.१८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी थंडावले आहेत. त्यानंतर आता कृपया प्रचाराला प्रारंभ झाला असून उमेदवार व उमेदवाराचे कार्यकर्ते हे साम, दाम, दंड, भेद, नीतीचा वापर करून आपल्या उमेदवाराला कसे निवडून आणता येईल, यासाठी रणनीती आखात आहेत. उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते पायाला भिंगरी लावत मतदारापर्यंत पोहोचून त्यांना विविध प्रकारचे आश्र्वासने, प्रलोभने देत आपल्याला मतदान करण्यासाठी विनवणी करीत असल्याचे चित्र संपूर्ण मतदारसंघात दिसून येत आहे.

मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीकडून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे सिद्धार्थ रामभाऊ खरात हे आपले नशीब आजमावीत आहेत. त्याचबरोबर महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार विद्यमान आमदार संजय भास्कर रायमुलकर हे आपले नशीब आजमावत आहेत.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून भैयासाहेब गोविंदराव पाटील, बहुजन समाज पार्टीकडून संजय समाधान कळसकर, वंचित बहुजन आघाडीकडून डॉ.सौ.ऋतुजा ऋषांक चव्हाण, महाराष्ट्र स्वराज्य पार्टीकडून दीपक केदार, जय सेवालाल बहुजन विकास पार्टीकडून नितीन बालमहेंद्र सदावर्ते, रिपब्लिकन सेनाकडून संघपाल कचरू पनाड, आझाद समाज पार्टीकडून संजय शामराव खिलारे तर अपक्ष म्हणून अशोक हिवाळे, अड्.ओम श्रीराम भालेराव, सिद्धार्थ प्रल्हाद खरात, डॉ.जितेश वसंत साळवे, देविदास पिराजी सरकटे, पुनम विजय राठोड, प्रा.भास्कर गोविंदा इंगळे, महीपंत पुंजाजी वाणी, राजेश अशोकराव गवळी, डॉ.संतोष चंद्रकांत तायडे हे १९ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. यापैकी आता कोणाला मतदार पसंती देत त्यांच्या गळ्यात विजयाची माळ टाकतात. हे येत्या २३ नोव्हेंबर रोजी निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

# आचारसंहितेच्या कालावधीत ६८ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त: २२३ आरोपींना अटक तर ३७ वाहने जप्त

## राज्य उत्पादन विभागाची कारवाई





दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा /प्रतिनिधी : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीत अवैध मद्यनिर्मिती, वाहतुक व विक्री मोठ्या प्रमाणात होतात. अशा घटनाना प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. मोहिमेंतर्गत आचारसंहिता कालावधीत दि. १७ नोव्हेंबरपर्यंत अवैध मद्यनिर्मिती व विक्री प्रकरणी प्रकरणी २२३ आरोपींना अटक करण्यात आले असून ३७ वाहने जप्त केली आहेत. या कारवाईत ६८ लक्ष ७१ हजार ५५१ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आले, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी दिली आहे.

दि १५ ऑक्टोबर ते १७ नोव्हेंबर २०२४ अखेर बुलढाणा जिल्ह्यातील हातभट्टी ठिकाण, तसेच अवैध मद्यविक्री केंद्रावर विविध ठिकाणी छापे घालुन २२३ आरोपींना अटक केली आहेत. सदर गुन्ह्यात एकुण ३७ वाहने जप्त केली असून एकुण रुपये ६८ लक्ष ७१ हजार ५५१ रुपयांचा मुद्येमाल जप्त केलेला आहे. सदर कारवाई बुलढाणा जिल्हयातील मौजे बोराखेडी, पाडोळी, मातला, पेसोंडा, चौंडी, बोरी आडगाव, राजूर उमरखेड शिवार, कोलवड इत्यादी ठिकाणी छापे टाकुन केलेली आहे.

जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय जप्त मुद्देमालाची माहिती याप्रमाणे : मलकापूर येथे ३३ गुन्हे, ६३३०.०५ लिटर मद्य व १० जप्त वाहनांची किंमत १२ लाख ५५ हजार रुपये असे एकूण जप्त मुद्देमालाची किंमत २० लक्ष ६ हजार ४८६ रुपये आहेत. बुलडाणा येथे ५३ गुन्हे, १२३१३.७३ लिटर मद्य व १० वाहनांची किंमत १४ लक्ष ९५ हजार रुपये असे एकूण मुद्देमालाची किंमत २२ लाख १ हजार ७६० रुपये आहेत. चिखली येथे २५ गुन्हे, ५१०६.९२ लिटर मद्य व दोन वाहनाची किंमत ९७ हजार असे एकूण मुद्येमालाची किंमत ३ लाख ७२ हजार ७५० रुपये आहेत. सिंदखेड राजा येथे ३३ गुन्हे, १५२१.८८ लिटर मद्य व चार जप्त वाहनाची किंमत ६ लाख ८५ हजार रुपये असे एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ९ लक्ष ४९ हजार २३५ रुपये आहेत. मेहकर येथे २८ गुन्हे, १४८४.४८ लिटर मद्य व जप्त सहा वाहनांची किंमत ४ लाख रुपये असे एकूण जप्त मुद्देमालेची एकूण किंमत ५ लाख ८६ हजार १५५ रुपये आहेत. खामगाव येथे २९ गुन्हे, ४५३२.०३ लिटर मद्य, तीन वाहनाची किंमत १ लाख ६८ हजार असे एकूण जप्त मुद्देमालेची किंमत ४ लाख ८६ हजार२४०६ रुपये आहेत. जळगाव जामोद येथे २२ गुन्हे, २८२७.२२ लिटर जप्त मद्य व दोन वाहनाची किंमत ६००००/- हजार असे एकूण जप्त मुद्येमालाची एकूण किंमत २ लाख ६९ हजार २२९ रुपये आहेत. सातही मतदारसंघात राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत २२३ गुन्हे, ३४११६.३१ लिटर मद्य तर ३७ जप्त वाहनांची एकूण किंमत ४१ लाख ६० हजार असे एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ६८ लक्ष ७१ हजार ५५१ रुपयांचे आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त विजय सुर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे व विभागीय उप-आयुक्त अर्जुन ओहोळ, यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचे गुन्हा अन्वेषणाचे कामकाज सुरु आहे. तसेच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक डॉ. पराग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. सदर कारवाई निरीक्षक किशोर पाटील, दुय्यम निरीक्षक ए.जी. शिंदे, दुय्यम निरीक्षक आर. के. विठोरे, सतिश पाटील तसेच निरीक्षक विकास पाटील यांच्या अधिनस्त असलेले दुय्यम निरीक्षक आर.एन. गावंडे, राहुल रोकडे यांच्या सहभागाने व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क व त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचा सहभाग होता.




**विशेष मोहिमेंतर्गत एकाच दिवशी १७ लाखाचा मुद्देमाल जप्त**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यातील विविध ठिकाणी दि. १७ नोव्हेंबर रोजी एका दिवशी अवैध दारु निर्मीती, हातभट्टी ठिकाण, अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे घालुन ११ गुन्हे नोंदविले असुन १३ आरोपींना अटक केले आहे. सदर गुन्ह्यात एकुण दोन चारचाकी व चार दुचाकी वाहने जप्त केली असून मुद्देमालाची एकूण किंमत १७ लक्ष ९६ हजार ८९० रुपये आहेत.

**१८ ते २० नोव्हेंबरपर्यंत मद्यविक्री बंद**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात कोरडे दिवस पाळण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुसार दि. १८ नोव्हेंबरचे सायंकाळी ५ वाजेपासुन ते २० नोव्हेंबरपर्यंत जिल्ह्यातील सर्व मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद राहतील. तसेच दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीच्या दिवशी कोरडा दिवस जाहीर करण्यात आलेला आहे. मध्यप्रदेश राज्याच्या सिमावर्ती भागात सुद्धा कोरडा दिवस जाहीर करण्याबाबत बुरहानपुरचे (मध्यप्रदेश) जिल्हाधिकारी यांना पत्र देण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्ह्यात रात्री गस्त घालुन खाजगी वाहने, ट्रॅव्हल्स इत्यादी मधुन अवैध मद्य वाहतुक होऊ नये याकरिता कसुन तपासणी करण्यात येत आहे. सिमावर्ती जिल्ह्याच्या मार्गावर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून मध्यप्रदेश अबकारी विभागासोबत संयुक्त मोहिम राबविण्यात येत आहे. अवैध मद्य विक्रेते, वाहतुक व विक्री करणाऱ्यावर तसेच हॉटेल्स, ढाब्यांची तपासणी करुन ढाबा चालक, मालकांसह त्याठिकाणी मद्य सेवन करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. अनियमीतता आढळून येणाऱ्या परवानाधारक मद्यविक्री दुकानदारांवरही कारवाई सुरु आहे. नागरीकांनी अवैधरित्या मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स ढाब्यावर जाऊन मद्य सेवन करु नये, असे आवाहन करण्यात येत आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, ढाब्याबाबत, अवैध मद्यनिर्मीती वाहतुकीबाबत माहीती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसअॅप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती द्यावी.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...


### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून जवळपास दोन दिवसात ७ लाखाचा दारु साठा जप्त



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरातील झाल्टा फाटा व सिडको एन ७ मधील आंबेडकर नगर मधून राज्य उत्पादन शुल्क विभागाने जवळपास दोन दिवसात ७ लाखाचे मद्य जप्त केले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाला आंबेडकर नगर मध्ये अवैद्य पद्धतीने मद्य विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती त्यावरून त्या ठिकाणी विभागाने कारवाई करून जवळपास दोन दिवसात ७ लाखाचे मद्य जप्त केले आहे. झाल्टा फाटा परिसरातील हॉटेल कार्तिकी ढाबा या ठिकाणी काही मद्यपी अवैधरीत्या मद्यपान करत असणाऱ्यांवर गुन्हा दाखल करून अटक केली आहे, मात्र मद्य विकणारा आरोपीने पळ काढला. तसेच सिडको एन ७ आंबेडकर नगर मध्ये अवैधरीत्या दारूचा साठा विक्रीसाठी ठेवण्यात आला असून राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्या ठिकाणी छापा मारत एकूण एक लाख रुपये किंमतीचा मद्य साठा जप्त केला आहे. या मधील आरोपींचा शोध सुरू आहे. निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.

### निवडणूक आयोगाच्या पथकाने छापा टाकलेल्या रक्कमेशी माझा कोणताही संबंध नाही -सदानंदनवले



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/ प्रतिनिधी :** नाशिक शहरातील नामांकित हॉटेलमध्ये आज सकाळी निवडणूक आयोगाच्या पथकाने छापा टाकला या छाप्यामध्ये कोट्यावधी रुपयांची रक्कम मिळून आल्याची माहिती मिळाली होती. यावेळी शिंदे गटाचे पदाधिकारी सदानंद नवले यांची गाडी आणि नाव आल्याने सदानंद नवले यांनी यासंदर्भात खुलासा केला आहे. पक्षाच्या वरिष्ठांनी मला भेटायला बोलावले होते मात्र भेट होण्याच्या आधीच या ठिकाणीही निवडणूक आयोगाचे पथक दाखल झाले आणि त्यात माझी गाडीत ही रक्कम आढळून आल्याची चर्चा सुरू झाली मात्र या रकमेचा माझा आणि माझ्या गाडीचा कोणताही एक संबंध नसल्याचं सदानंद नवले यांनी या घटने संदर्भात खुलासा केला आहे.

### ठाण्यात कोणी पैसे वाटताना भेटला तर त्याच्या तंगड्या तोडू- अविनाश जाधव



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/ प्रतिनिधी :** मनसेचे ठाणे शहर विधानसभा क्षेत्राचे उमेदवार अविनाश जाधव यांनी आज आपल्या प्रचाराची सांगता महाराष्ट्र गीताने केली व त्यानंतर त्यांच्या प्रतारात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर फुलांची उधळन करत कार्यकर्त्यांचे आभार मानले. महाराष्ट्रातील लोकशाहीचा हा मेळावा होता त्याची सांगता ही महाराष्ट्र गीतानेच झाली पाहिजे, एक महाराष्ट्र सैनिक म्हणून आम्ही आमचे कर्तव्य बजावले. मतदारांना आवाहन आहे की शंभर टक्के सगळ्यांनी मतदान करा. मतदार संघात जर कोणी पैसे वाटताना भेटला तर त्याच्या तंगड्या तोडू. भाजपकडे खूप पैसे आहेत, पैशाचाच वापर करणार आहे कारण त्यांच्या आमदाराने काही कामच केलेले नाही. मी निवडून आलो तर चांगलेच काम करेल पण नाही आलो तरी ठाणेकरांसाठी काम करणार अशी प्रतिक्रिया अविनाश जाधव यांनी दिली आहे.

### एक चुकीचं पाऊल अन् रीलच्या नादात होत्याचं नव्हतं झालं; समुद्रात बोटीवर चालता चालता तरुणाबरोबर भयंकर घडलं

**मुंबई/प्रतिनिधी :** सोशल मीडियावर व्हिडीओ आणि रील्स बनवून अनेकांनी आपलं आयुष्य बदललं आहे. आज असे लोक लाखो-कोट्यवधी रुपये कमावत आहेत. पण, व्हिडीओ बनविण्याच्या नादात अनेक जण आपला जीव धोक्यात घालतात. अनेकदा अशा घटना घडल्या आहेत; ज्यात व्हिडीओ बनविताना अनेकांना प्राणसुद्धा गमवावे लागलेले आहेत. रेल्वे रुळांवर, समुद्रात, चालत्या ट्रेनमध्ये, चालत्या बाईकवर किंवा कारवर लोक स्टंट व्हिडीओ शूट करताना दिसतात; पण काही वेळा त्याचे त्यांना गंभीर परिणामही भोगावे लागतात. पाण्याच्या ठिकाणी मस्ती करू नका, असे अनेकदा सांगितले जाते; मात्र तरीही तरुणाई ऐकत नाही. मग साहजिकच कित्येकदा अशा व्यक्तींना प्रत्यही जीवालाही मुकावं लागतं.

# पैशावाल्यांना त्यांची जागा दाखवून द्या

## योग्य उमेदवार निवडण्याची हीच संधी वाया घालू नका : ऋषांक चव्हाण यांचे मतदारांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/ प्रतिनिधी :** मेहकर लोणार मतदार संघ हा प्रस्थापित्यांचा मतदारसंघ झालेला आहे. मात्र असे असताना मतदारसंघात विकास झालेला नाही, त्यामुळे एक सामान्य कुटुंबातील व सामान्य मतदारांच्या बळावर वंचित बहुजन आघाडी कडून डॉ.सौ ऋतुजा चव्हाण ह्या विधानसभा निवडणुकीमध्ये उभ्या राहिल्या आहेत. त्यांना मतदारांनी भरघोस मतांनी विजयी करावे व प्रस्थापित व पैशावाल्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार ऋतुजा चव्हाण यांचे पती ऋषांक चव्हाण यांनी केले. यावेळी ते पुढे म्हणाले की, मेहकर लोणार मतदार संघात अनेक समस्या आहेत. या समस्येचा आढावा घेण्यासाठी आम्ही संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. यावेळी असे लक्षात आले की या मतदारसंघात नवीन चेहरा मतदारांना हवा आहे. त्यामुळे आम्ही सामान्य कुटुंबातील व्यक्ती व सामान्य मतदारांच्या बळावर निवडणुकीत उभे राहिलो. मात्र,डॉ. सौ. ऋतुजा चव्हाण या मतदार संघात उभी राहताच प्रस्थापिताच्या पायाखालची वाळू सरकली आहे. निवडणुकीत अर्ज दाखल करताच विरोधकांनी अनेक आरोप केले. हे मॅनेज होती, बसतील, अमुक उमेदवारांना निवडून आणण्यासाठी याचा फायदा होईल,यासाठीच ते उभ्या राहिल्या आहेत. अशा अनेक टीका केलेल्या आहेत. मात्र आम्ही कोणत्याही दबावाला बळी न पडता आणि तेवढ्याच ताकतीनशी मतदारांपर्यंत पोहोचून प्रचार केलेला आहे. त्यानंतर साम, दाम, दंड, भेदनीतीचा वापर करून आम्हाला थांबवण्याचे कामही करण्यात आलेले आहे. मात्र सामान्य मतदारांच्या बळावर आम्ही ही लढाई लढत आहोत. आता ही लढाई मतदारांच्या हातात गेलेली आहे. प्रचार तोफा थंडावल्या असून मतदारांना योग्य निर्णय घ्यावा लागणार आहे. एक सामान्य कुटुंबातील व्यक्ती उभा राहून तो निवडून येत असल्यास प्रस्थापितांचे मात्र राजकारण संपुष्टात येणार आहे. ही भीती त्यांना आहे. तर बाहेरील ठिकाणी पैशावाला उमेदवार येथे येऊन मतदार व कार्यकर्त्यांना पैसे पुरवून विकत घेण्याची भाषा करीत आहे. त्यामुळे मतदारांनी आपल्या बुद्धीचा वापर करून योग्य उमेदवाराला निवडावे अन्यथा कोणीही पैशाच्या बळावर आपल्यावर राज्य करेल, त्यामुळे याचा निर्णय तुम्ही घ्यावा सामान्य कुटुंबातील व्यक्ती जर निवडून आला तर पुढे तो जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत अशा सर्वच निवडणुकांमध्ये उभा राहून सत्ता हातात घेईल, त्यामुळे प्रस्थापितांचे राजकारण संपुष्टातील अशी भीती या राजकारणाला वाटत आहे. त्यामुळे मतदारांचे ब्रेन वॉश केले जात आहे. मात्र मतदारांनी याला बळी न पडता विचारपूर्वक निर्णय घ्यावा आणि एका सामान्य कुटुंबातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार असलेल्या डॉ. ऋतुजा चव्हाण यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन ऋषांक चव्हाण यांनी केले आहे.

# मुंबई शहर जिल्ह्यातील दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांकरिता मतदानासाठी मोफत वाहन व्यवस्था

- विधानसभा मतदारसंघनिहाय दिव्यांग समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती
- समन्वय अधिकारी व रूट प्लानची माहिती मिळण्यासाठी क्युआर कोडची निर्मिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीसाठी मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ०७.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत मतदान होणार आहे. 'एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये' (छे ीींशी ीं लश श्रशषीं लशहळपव) या निवडणूक आयोगाच्या घोषणेप्रमाणे मतदानाच्या दिवशी दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी मुंबई शहर जिल्हा प्रशासनातर्फे मोफत वाहन व्यवस्था सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिव्यांग मतदारांच्या सुविधेसाठी प्रत्येक विधानसभा मतदार संघनिहाय मोफत बस प्रवासासाठी दिव्यांग समन्वय अधिकारी नेमले आहेत. मोफत बस सुविधेकरिता बेस्टकडून मतदान केंद्राच्या निश्र्चित ठिकाणानुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी रूट प्लान तयार करण्यात आला आहे. समन्वय अधिकारी व मार्ग नियोजन (रूट प्लान) एका क्लिकवर मतदारांना मिळण्यासाठी क्युआर कोड तयार करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील जास्तीत जास्त दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांनी या सेवेचा लाभ घेवून मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने दिव्यांग मतदार तसेच ८५ वयापेक्षा जास्त वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिक मतदारांच्या सोयी सुविधांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. यामध्ये दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक यांना मतदान केंद्रावर सोयी-सुविधा पुरविण्याचे निर्देश आहेत. या निर्देशानुसार मुंबई शहर जिल्हा निवडणूक यंत्रणेमार्फत मतदानाच्या दिवशीचे काटेकोरपणे नियोजन करण्यात आले असून दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी विशेष सोयी - सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या मतदारांना आपल्या मतदान केंद्रापर्यंत पोहचविण्यासाठी मतदार संघनिहाय समन्वय अधिकारी, दिव्यांग मित्र यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दिव्यांग मतदारांनी सदर विशेष सुविधेचा लाभ घेण्यासाठी १९५० या टोल फ्री क्रमांकावर किंवा समन्वयक दिलीप यादव यांच्याशी ७३८५९१९४०३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्रीमती सुनिता मते जिल्हा दिव्यांग नोडल अधिकारी मुंबई शहर यांनी केले आहे. क्युआर कोडवर क्लिक केल्यानंतर मतदारांना मतदार संघ निहाय नेमलेले समन्वय अधिकारी, बसचा रूट प्लान यांची माहिती मिळणार आहे.



सर्व विधानसभा मतदारसंघामध्ये दिव्यांग मतदारांकरिता दिव्यांग समन्वय अधिकारी याप्रमाणे ३७ दिव्यांग समन्वय अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. बेस्ट बससेवा यांच्याकडून ज्येष्ठ नागरिक मतदार व दिव्यांग मतदार यांना मतदान केंद्रावर ने-आण करणे करिता व्हीलचेअर, व्हीलचेअर व्हॅन, दिव्यांग सुलभ बसेस, ईको व्हॅन, टॅक्सी, मतदानाच्या ठिकाणी जिन्यावर सरकत्या 'व्हीलचेअर'ची (स्टेअर क्लायबिंग व्हीलचेअर) अशी वाहन उपलब्ध करून देण्यात आली आहेत. बेस्टच्या कर्मचाऱ्यांना मतदारसंघनिहाय नेमलेल्या दिव्यांग समन्वय अधिकारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक संपर्कासाठी देण्यात आले आहेत.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय मतदान केंद्रांनुसार बेस्ट बस सेवेच्या अधिकाऱ्यांनी रूट मॅप करून दिलेला आहे व त्यानुसार बस थांबे ठरवण्यात आलेले आहेत. या बस थांब्यावरून दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिक मतदारांना या बस सेवेचा लाभ घेता येईल. तसेच लोको मोटर दिव्यांगांकरिता १० व्हीलचेअरयुक्त लो फ्लोर बसेस व त्यासोबत एक सहाय्यक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

दिव्यांग मतदार व ज्येष्ठ नागरिक मतदारांना मदत करण्याकरिता एकूण ६७१ दिव्यांग मित्र राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक नियुक्त करण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी अरुंद रस्त्यामध्ये बस जाणार नाही, अशा ठिकाणी प्रत्येक मतदारसंघनिहाय दिव्यांगांच्या संख्येनुसार टॅक्सी व इको व्हॅन प्रत्येकी २५ टॅक्सी २५ इको व्हॅन उपलब्ध करून देण्यात येत आहे. याप्रमाणे दिव्यांग मतदार व ज्येष्ठ नागरिक मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्याकरिता नियोजन करण्यात आलेले आहे.

दिव्यांग मतदारांना मोफत बस सुविधेसाठी विधानसभा मतदारसंघनिहाय समन्वय अधिकारी यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक खालील प्रमाणे.

- धारावी - श्री. अयाज शेख (९८९२२७०८२२)
- सायन कोळीवाडा - विजय साळुंखे (८३६९५३२१३८)
- वडाळा - शैलेन्द्र पवार (७३०३२२०९०५)
- माहीम - रोशन पिंपळे (८९८३०४१२३६)
- वरळी - ज्ञानेश्र्वर पाटील (९४२२२००१७६)
- शिवडी - हेमलता भांगे (९९६७५२०१६५)
- भायखळा - वर्षा डोकरे (९९३०३२१००१)
- मलबार हिल - स्वाती जिरंगे (९८६९०२४२५४)
- मुंबादेवी - सूचित पांचाळ (९९८७०४८२५३)
- कुलाबा - दत्तात्रय कांबळे (९१३७५१३८३२)

### नयनतारा स्टारर 'रक्काई'च्या पोस्टरसह टीझर आणि शीर्षक झालं प्रदर्शित

**मुंबई/प्रतिनिधी :** साऊथ सिनेसृष्टीतील 'लेडी सुपरस्टार' म्हटली जाणारी नयनतारा आज १८ नोव्हेंबर रोजी ४० वर्षांची झाली आहे. तिच्या वाढदिवशी तिच्या आयुष्यावरील 'नयनतारा: बियॉन्ड द फेयरीटेल' हा माहितीपट प्रदर्शित करण्यात आला आहे. दरम्यान, नयनताराच्या वाढदिवशी ड्रमस्टिक्स प्रॉडक्शननं त्यांच्या नवीन चित्रपटाची घोषणा करून चाहत्यांना खूश केलंय. १८ नोव्हेंबर रोजी, ड्रमस्टिक्स प्रॉडक्शननं एक्सवर एक पोस्ट केली. यामध्ये या चित्रपटाचे पोस्टरसह शीर्षक आणि टीझर शेअर करण्यात आले आहे. निर्मात्यांनी या पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिलं, 'युद्ध सुरू झाले आहे. लेडी सुपरस्टार नयनताराच्या 'रक्काई' या धमाकेदार शीर्षकाचा टीझर सादर करत आहोत. तिला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.'

'रक्काई'च्या टीझरची सुरुवात एका म ुलाच्या रडण्याच्या आवाजाने होते. यानंतर, म ोकळ्या मैदानाची एक झलक दाखवली जाते, जिथे एका झोपडीच्या बाहेर टॉर्चसह शत्रूचे काही सैन्य असते. या दरम्यान, एका छोट्या मुलाची झलक दाखवली जाते, जो भुकेलेला असतो. यानंतर नयनताराची झलक दाखविली जाते, यात ती तिच्या शत्रूंशी लढण्यासाठी आणि आपल्या मुलाला शांत करण्याची तयारी करताना दिसते.

याशिवाय ती लाल मिरची पावडर देखील तयार करताना दिसते. यानंतर, ती मुलाला दूध पाजते आणि त्याला झोपून देते. यादरम्यान शत्रूंच्या सैन्य तिच्या झोपडीकडे धाव घेतात. यानंतर ती शत्रूंशी लढण्यासाठी हातात शस्त्र घेऊन मैदानात एंट्री करते. टीझरमध्ये नयनतारा शत्रूंना ठार करताना दिसते. टीझरच्या शेवटी नयनतारा शत्रूंच्या डोळ्यात मिरची पाऊडर टाकताना दिसते. टीझरमध्ये नयनताराचा हा ॲक्शन अवतार तिच्या चाहत्यांना खूप आवडला आहे.

दुसरीकडे, 'रक्काई'चा टीझर शेअर करताना नयनतारानं शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिलं, 'ज्या देशात न्याय फक्त एक आठवण आहे. एक आई, जिचं जग तिचं मूल होतं. पण जेव्हा तिच्या मुलाच्या जीवाला राक्षसापासून धोका असतो. ती तिथून पळून जात नाही. ती डगमगत नाही, त्याऐवजी, ती युद्धाची घोषणा करते.' आता अनेकजण ही पोस्ट साऊथ स्टार धनुषबरोबर जोडत आहे.

# तुम्ही ठाकरे आहात तर ठाकरेंसारखं वागा, दिल्लीचे बूट चाटू नका; संजय राऊतांचा राज ठाकरेंवर हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** तुम्ही ठाकरे आहात तर ठाकरेंसारखे राहा...दिल्लीचे बूट चाटू नका, देवेंद्र फडणवीसांची पालखी वाहू नका, अशी टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्यावर केली आहे. विक्रोळीतील महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील राऊत यांच्या प्रचारार्थ संजय राऊत बोलत होते.

राज ठाकरे इकडे येऊन बोलले की, इकडे भिकारडा संपादक राहतो. बरोबर आहे...पंतप्रधान नरेंद्र मोदी



यांनी महाराष्ट्र येवढा भिकारी केलेला आहे आणि त्या मोदींचे आपण पाय चाटताय...बाळासाहेब ठाकरेंनी नेमलेल्या संपादकाला तुम्ही भिकारडा म्हणतात, यावरुन तुमचं बाळासाहेब ठाकरेंवरील प्रेम दिसून येतं, असं संजय राऊत म्हणाले. ज्या सामनाने या महाराष्ट्रामध्ये मराठी लोकांच्या अस्मितेची लढाई मी ३५-४० वर्षे लढत राहिलो. ही मळमळ तुम्ही इकडे येऊन बाहेर काढली. त्यांचं असं म्हणणं आहे की मी ठाकरे आहे, तर आम्ही देखील राऊत आहोत. बाळासाहेबांनी घडवलेले राऊत आहोत. तुम्ही ठाकरे आहात तर ठाकरेंसारखे राहा...दिल्लीचे बूट चाटू नका, देवेंद्र फडणवीसांची पालखी वाहू नका, अशी माझी विनंती आहे, असा हल्लाबोल संजय राऊतांनी केला.

तुमची खुर्ची आमच्यासाठी आणि आमची खाट तुमच्यासाठी- संजय राऊत


एका सभेत त्यांनी माझ्या नावाची खाली खुर्ची ठेवली. मला यामागचं कारण समजलंच नाही. राज ठाकरेंसमोर माझ्या नावाची खुर्ची ठेवली, सन्मानीय संजय राऊत वैगरे...मी म्हटलं आता आपली सभा आहे, आपण त्यांच्यासाठी खाट ठेऊया, कारण २३ तारखेला त्यांची खाट टाकणारचं आहोत. तुमची खुर्ची आमच्यासाठी आणि आमची खाट तुमच्यासाठी...खटाखट...असं मिश्किल विधानही संजय राऊतांनी केलं. आम्ही बाळासाहेबांचे कडवट शिवसैनिक आहोत. आम्ही आमची निष्ठा विकली नाही, आम्हाला ईडीने अटक केली म्हणून आम्ही गांडू सारखं वागलो नाही. आमच्यावर देखील दबाव आले, पक्ष सोडा, उद्धव ठाकरेंना सोडा..परंतु आम्ही तुरुंगात जाताना ज्या रुबाबात गेलो, त्याच रुबाबात बाहेर आलो...फगवा फडकवत, असं संजय राऊतांनी सांगितलं. तुम्हाला एकदा ईडीने काय बोलावलं, तुम्ही दोन वर्षे कोमात गेलात. तुम्ही ठाकरे आहात म्हणतात ना, म्हणून तुम्हाला हे नम्रपणे सांगतोय, असं संजय राऊतांनी सांगितले.

# मतदारसंघात सुनामी आली आहे. या सुनामीत हा निष्क्रिय आमदार वाहून जाणार : सिद्धार्थ खरात

## महायुतीने महाराष्ट्रातील उद्योग पळविले

### शिवसेना युवा नेते आशिष राहाटे : मेहकर येथील सभेत विरोधकांवर टीका






**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे हे दिलेले वचन पाळणारे आहेत. उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या काळात महाराष्ट्रातील युवकांच्या हाताला रोजगार मिळावा, यासाठी अनेक उद्योग व्यवसाय महाराष्ट्रात आणले. कोरोना काळात कुटुंब प्रमुख या नात्याने संपूर्ण महाराष्ट्राची काळजी घेतली, त्यामुळेच त्यांचा महाराष्ट्रातच नव्हे देशात पहिल्या पाच मुख्यमंत्र्यातील एक मुख्यमंत्री म्हणून गौरव झालेला आहे. मात्र महायुती सरकार येताच शेजारील गुजरात राज्याच्या इशाऱ्यावर महाराष्ट्र सरकार चालवत असताना महायुतीने महाराष्ट्रात उभे केलेले उद्योग व्यवसाय हे गुजरातला पळविले अशी टीका उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे मेहकर येथील शिवसेना युवा नेते तथा उपजिल्हाप्रमुख आशिष राहाटे यांनी केले. ते महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारार्थ मेहकर येथे दि.१८ नोव्हेंबर रोजी आयोजित सभेला संबोधित करताना बोलत होते. या कार्यक्रमाला महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते यांचे व्यासपीठावर उपस्थिती होते. यावेळी शिवसेना युवा नेते उपजिल्हाप्रमुख आशिष राहाटे म्हणाले की, महाविकास आघाडीचे सरकार येताच कोरोना सारखी महाभारी आली, मात्र उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राचे कुटुंब प्रमुख या नात्याने संपूर्ण महाराष्ट्राची काळजी घेतली. त्यामुळेच ते संपूर्ण देशातील पाच मुख्यमंत्र्यातील उत्कृष्ट मुख्यमंत्री म्हणून गौरविल्या गेले. उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील युवकांना रोजगार मिळावा, यासाठी अनेक उद्योग व्यवसाय महाराष्ट्रात आणले. मात्र महायुती सरकार येताच त्यांनी गुजरातच्या इशाऱ्यावर महाराष्ट्रातील उद्योग व्यवसाय हे गुजरातला हलवले, अशी टीका माहायुती सरकारवर केली. तर मेहकर मतदार संघात गद्दार निघाले असून यांनी १५ वर्ष सत्ता उपभोगली ते मात्र आपल्या निष्ठेची प्रामाणिक न राहता गद्दार निघाले अशी टीकाही केली. महायुती सरकारच्या काळात महिला सुरक्षित नाहीत, ज्या महायुतीने ज्याप्रमाणे उद्धव ठाकरे यांना यांच्यासोबत जशी दगाबाजी केली, तसेच दगाबाजी मेहकर मतदार संघात आमच्या सोबत केली गेली आहे.धर्मवीर स्व. दिलीप राहाटे यांनी जिल्ह्यात शिवसेनेचे रोपटे लावले त्यांच्या सहकाऱ्यांनी हे रोपटे मोठे केले. त्यामुळे संपूर्ण जिल्हाभरात शिवसेना पोहोचली, स्व. दिलीपराव रहाटे यांनी स्वतःची पर्वा केली नाही, कुटुंबाची पर्वा केली नाही, मात्र एकनिष्ठ राहून शिवसेना वाढवली असे असताना मेहकर मतदारसंघात मात्र निष्ठावंत शिवसैनिकांना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याप्रमाणेच दगाबाजी झाली आहे.अशी टीका स्थानिक लोकप्रतिनिधीवर केली. वडिलांचा सहवास आम्हाला लाभला नाही, हे आमचे दुर्दैव आहे.मात्र आम्ही शिवसेनेसोबत एकनिष्ठ राहिलो, शिवसेनेत शिकलो ज्यांच्या भरोशावर ज्यांनी हे कमावले त्यांनी मात्र धर्मवीर स्व. दिलीपराव राहाटे यांच्या विचाराला बाजुला केले. मात्र सिद्धार्थ खरात यांनी धर्मवीर स्व. दिलीपराव राहाटे यांचे विचार यांचा इतिहास समोर आणण्यासाठी त्यांचे पुस्तक प्रकाशित केले आणि त्यांचे कार्य पुढे आणले. जे गद्दार आहेत तेच महाविकास आघाडीवर आरोप करतात. मात्र जनतेने कोरोना काळात कुटुंबप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे यांनी घेतलेली काळजी पाहिलेली आहे. कर्जमाफी करण्याचे पहिले पाऊल उद्धव ठाकरे यांनी टाकलेले आहे. एका अंगठ्यावर त्यांनी दोन लाख रुपये एका झटक्यात माफ करून शेतकऱ्यांना मोठा आधार मिळवून दिलेला आहे. महाराष्ट्राचे भविष्य समोर ठेवून अनेक उद्योग व्यवसाय आणले. परंतु महायुतीने हे उद्योग व्यवसाय गुजरातला पळविले आहे. आताही महाविकास आघाडीचे सरकार आल्यास शेतकऱ्यांना तीन लाखापर्यंत कर्जमाफी दिल्या जाईल, रोजगार उपलब्ध करून दिल्या जाईल, त्याचबरोबर जीवन आवश्यक असलेल्या पाच वस्तूचे भाव हे कमी ठेवल्या जातील, असे आश्र्वासन उद्धव ठाकरे यांनी दिले आहे आणि उद्धव ठाकरे हे आश्र्वासनाकडे वचन म्हणून पाहतात आणि ते दिलेले वचन पूर्णही करतात. हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलेले आहे. महाराष्ट्रात आता महिला सुरक्षित नाहीत, मुलीवर अन्याय, अत्याचार वाढलेले आहेत. त्यामुळे या महायुती सरकारला त्यांची गद्दारीची जगा दाखवून देण्याची वेळ आली असून त्यांना धडा शिकवा व महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन यावेळी धर्मवीर स्व. दिलीपराव रहाटे यांचे पुत्र तथा शिवसेना युवा नेते उपजिल्हाप्रमुख आशिष राहाटे यांनी केले.

### लायकी नसताना आमदार केले व तेच गद्दार झाले

मेहकर लोणार मतदार संघातील लोकप्रतिनिधीची लायकी नसताना त्यांना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी आशीर्वाद देऊन आमदार केले. एवढेच नव्हे तर पंधरा वर्षे आमदारकी देऊन विकास कामे करण्याची जबाबदारी दिली. मात्र येथील आमदाराने विकास कामे न करता प्रचंड प्रमाणात गैरप्रकार करून आपले स्वहीत जपले आहे व मेहकर लोणार मतदार संघातील मतदारांना विश्वासघात केला आहे. आता या गद्दारांना त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली असून येत्या वीस तारखेला मतदानातून त्यांना त्यांची जागा दाखवा व महाविकास आघाडीचे उमेदवार या नात्याने मला प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांनी केले. त्याचबरोबर गेल्या पंधरा वर्षात यांनी कोणते विकास कामे केली याचा हिशोब मागावा आणि हा हिशोब घेण्यासाठी जनता आतुरलेली आहे आणि लोकशाहीच्या न्यायालयामध्ये या गद्दारांना निस्तनाबूत करा, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. आपल्या हातून कळत नकळत यांना आमदार करण्याचे चुक झाली,मात्र त्या पुन्हा होऊ नये याची काळजी घ्या, मतदार संघातील पाणंद रस्ते, पाणीपुरवठा, वीज पुरवठा अशा अनेक समस्या असताना या समस्या मार्ग न लावता त्यांनी केवळ स्वहीत जपले आहे. त्यामुळे येथील समस्या कायम आहेत. विकास कामाचे ठेके हे मुलाला, साडू, मेव्हणा, नातेवाईक यांना दिले. तर चार-पाच चले सपाटे यांना देऊन कामे न करता निधी हडप केला आहे. तुम्हाला मी आश्र्वासन देतो. मेहकरला ठाणे पुणे चे स्वरूप देण्यासाठी व जगप्रसिद्ध लोणार सरोवरला लोणावळ्याची स्वरूप देण्यासाठी आणि मेहकर लोणार मतदार संघाचे सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटीबद्ध राहील फक्त तुम्ही मला एकदा संधी द्या, असे आवाहन यावेळी सिद्धार्थ खरात यांनी केले. या सभेला प्रा. नरेंद्र खेडेकर यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. त्याचबरोबर श्यााम उमाळकर, सागर पाटील, भास्करराव गारोळे, माजी नगराध्यक्ष कासमभाई गवळी, एन.ए.बळी, काँग्रेस नेते लक्ष्मणराव घुमरे, सरचिटणीस श्याम उमळकर यांच्याससह इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. या सभेचे आभार प्रदर्शन काँग्रेस तालुका अध्यक्ष देवानंद पवार यांनी केले.

### यांनी गैरप्रकार करून दुसऱ्यांना फक्त त्रास दिला : गारोळे

मेहकर लोणार मतदार संघातील लोकप्रतिनिधींनी गैरप्रकार करून फक्त दुसऱ्यांना त्रास दिला. त्यामुळे यांची लायकी ही जनतेला दिसून आली आहे. मेल्यावर यांची किंमत ही चार बांबू पोतंभर गवऱ्या एवढीच राहणार आहे. लाडकी बहिणीला पंधराशे रुपये दिले आहेत आणि अनेक सभा कार्यक्रमातून लाडकी बहीण लाडकी बहीण एवढाच दिंडोरा पेटवला जात आहे. आम्ही लाडके बहिण योजनेला तीन हजार रुपये देऊ आणि तेही सन्माननीय देऊ असे आश्र्वासन भास्करराव गारोळे यांनी या सभेत दिले. तसेच या सत्ताधाऱ्यांनी गोरगरिबाची दुकान तोडले आहेत. गोरगरिबावर अन्याय केला आहे. मात्र महाविकास आघाडीचा उमेदवार सिद्धार्थ खरात हे निवडून आल्यानंतर कोणत्याही गोरगरिबावर अन्याय होणार नाही, कोणाचे दुकान तोडले जाणार नाही सर्वांना न्याय देऊ असे मी तुम्हाला आश्र्वासन देतो आश्र्वासन न पाळल्यास तुम्ही मला जाब विचारा मात्र महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना प्रचंड मताने विजयी करा, असे आवाहन भास्करराव गारोळे यांनी यावेळी केली.

## मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास प्रतिबंध

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी २० नोव्हेंबर रोजी मतदान केंद्रात आणि केंद्राच्या १०० मीटरच्या आवारात कोणताही मोबाईल, स्मार्टवॉच, पेन कॅमेरा आदी इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेऊन येण्यास पूर्णतः प्रतिबंध करण्यात आले आहे. याविषयी मतदारांनी दक्षता घेवून मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

मतदान केंद्रात आणि केंद्राच्या १०० मीटरच्या आवारात मतदान केंद्र अध्यक्ष, सूक्ष्म निरीक्षक सोडून निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी, कर्मचारी, उमेदवार, उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी, वार्ताहर, मतदार, आदी कोणाही व्यक्तीला कोणताही मोबाईल, स्मार्टवॉच, पेन कॅमेरा, वायरलेट सेट यासह इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेऊन येण्यास पूर्णतः प्रतिबंध करण्यात आले आहे. कोणत्याही व्यक्तीने अनवधानाने ईलेक्ट्रॉनिक उपकरण सोबत बाळगल्यास मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या अंतरावर ठेवून मतदान केंद्रात प्रवेश करावा. मतदान केंद्रावर किंवा मतमोजणी केंद्रावर मोबाईल सापडल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याबाबत सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. ०००

## राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येईल- प्रतापराव जाधव

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील महायुती सरकारने १७ आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून लहान समाज असलेल्या लोकांना न्याय देण्याचं काम केलं आहे. या सरकारच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले गेले आहेत त्यामुळे राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार येईल असा विश्र्वास केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा येथे प्रसार माध्यमांशी बोलताना व्यक्त केला आहे. बुलढाणा रेसिडेन्सी येथे आज केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी पत्रकार परिषद घेतली त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की केंद्र आणि राज्य सरकारच्या लोकोपयोगी निर्णयामुळे महाराष्ट्रातील जनता महायुतीच्या बाजूने



उभी राहणार आहे. गेल्या ७५ वर्षांमध्ये राज्यातील छोटे छोटे समाज दुर्लक्षित राहिले होते या समाजाच्या हितासाठी राज्यातील महायुतीच्या सरकारने १७ आर्थिक विकास मंडळाची स्थापना करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. राज्यातील महायुती सरकारने प्रत्येक समाजाच्या हितासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राज्य आणि केंद्र सरकारच्या वतीने राबविल्या जात आहेत. महिला बचत गटांना सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून तालुक्याच्या ठिकाणी विक्री केंद्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शिवाय एमआयडीसी मध्ये कॉमन फॅसिलिटी सेंटर उभारून तेथे बचत गटाच्या महिलांनी उत्पादित केलेल्या मालाची पॅकेजिंग करून ती विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील लखपती दीदीच स्वप्न साकार होणार आहेत. बचत गटाच्या खेळत्या भांडवलातही वाढ करण्यात आली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील महायुती उमेदवारांच्या मतदारसंघात झालेली विकास कामे ही लोकांसमोर आहेत त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये महायुती उमेदवाराला बुलढाण्यातील जनता निवडून देणार आहे असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे उमेदवार संजय गायकवाड, भाजपाचे तालुकाध्यक्ष मोहन पवार सिद्धार्थ शर्मा, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा अनुजा सावळे, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष माया म्हस्के शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ओमसिग राजपूत उपस्थित होते.

## मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र ग्राह्य – जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** यंदाच्या विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे नाव मतदार यादीत आहे अशा मतदारांचे मतदार कार्डव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. या १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणताही एक पुरावा दाखवून मतदारांना मतदान करता येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॅा. किरण पाटील यांनी दिली आहे.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. ज्या मतदारांकडे मतदार ओळखपत्र नाही, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

या १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि ओळखपत्र आणून मोठ्यासंख्येन मतदान करावे,, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.